# प्रकरण दुसरे

# मराठी कादंबरीची वाटचाल आणि पौराणिक कादंबरी

# प्रकरण – २

# मराठी कादंबरीची वाटचाल आणि पौराणिक कादंबरी

मानवी जीवनातील यशापयश मोजण्याचे अनेक मार्ग असतात. मानवाच्या कर्तबगारीची विविध क्षेत्रे संभवतात. प्रत्येक क्षेत्रात माणूस सारख्याच प्रमाणात यशस्वी होत नाही. निसर्ग बहुधा एखादया क्षेत्रातील उणीव दुसऱ्या एखाद्या क्षेत्रातील आधिक्याने भरून काढतो. जीवनाचे यशापयश मोजणाऱ्याच्या विवक्षित दृष्टीकोनावर पुष्कळदा अवलंबून राहाते. साहित्याचेही असेच आढळते. साहित्य मापनाचेही विविध मार्ग संभवतात. त्यातही हे अधिक-उण्यांचे चित्र पाहावयास सापडते. केवळ 'अस्तित्व' एवढ्या एकाच मापाने कादंबरी मोजावयाची म्हटली, तरी आयुष्य शतक ओलांडून पुढे गेल्याचे आढळते.[१] सुमारे इ.स. १८५० पासून आजपर्यंतचा कादंबरीचा विस्तार पाहावा. तसेच प्रतिवर्षी प्रसिध्द होणाऱ्या कादंबरीची संख्या लक्षात घ्यावी. मग काळाबरोबर ह्या साहित्य प्रकारात होत गेलेल्या उत्क्रांतीने असे लक्षात येते की, 'करमणुकी बरोबरच ज्ञानप्राप्तीचे व ज्ञान प्रसाराचे एक उत्तम साधन म्हणजे कादंबरी वाङ्मय प्रकार होय.' ''ज्ञानाच्या रहदारीचा जो मार्ग चालू असेल त्याच मार्गाने जाऊन लोकांना ज्ञानदान करावे हे उचित होय. ज्या वेळी जे नाणे चालू असेल त्याच नाण्यात लोकांनी व्यवहार केला पाहिजे.'' असे कादंबरीच्या लोकप्रियतेस अनुलक्षून, ज्ञानप्रसाराचे साधन म्हणून तिचा गौरव करताना शि.म. परांजपे यांनी म्हटले आहे. अशा या कादंबरी वाङ्मयातील पौराणिक कादंबरीची स्थूलमानाने होणारी वाटचाल पाहत असताना कादंबरी वाङ्मयाचा उगम केव्हा व कसा झाला व त्यात निर्माण होत गेलेले इतर वाङ्मय प्रकार त्यातून पौराणिक कादंबरीचा जन्म केव्हा व कसा झाला याचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

ज्या हिंदवी स्वराज्याची स्थापना शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकाच्या मध्यात केली होती ते स्वराज्य सुमारे दीडशे वर्षे मराठे टिकवू शकले. पण प्रभावी इंग्रजी सत्तेपुढे मराठ्यांचे काही चालले नाही आणि पुन्हा एकदा पारतंत्र्याच्या बेड्या आपल्या

पायात अडकल्या. तांत्रिक अर्थाने पेशवाईचा शेवट इ.स. १८१८ मध्ये झाला असला तरी खरे म्हणजे इ.स. १८०० पासूनच पेशवाईचा शेवट झाल्यासारखाच होता. कारण इ.स. १८०० मध्ये नाना फडणीस मरण पावले आणि त्यांच्या बरोबर मराठे शाहीतील सत्तेचे साम्राज्य संपले आणि सर्व भारतभर इंग्रजी सत्तेचे साम्राज्य पसरले.

इंग्रजी राजवटीबद्दल भारतीय लोकांना कुतूहल वाटावे म्हणून इंग्रजांनी सुरूवातीच्या पन्नास वर्षात त्यांनी भौतिक सुधारणा घडवून आणल्या. कच्चे रस्ते पक्के करून शहरांना जोडले. टपालाची व्यवस्था सर्वसामान्य लोकांना उपलब्ध केली. इ.स. १८५३ मध्ये पहिली रेल्वे भारतात सुरू केली. महाराष्ट्राच्या दृष्टीने पुणे व मुंबई शहराचे औद्योगिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिकदृष्टया त्याचे महत्त्व वाढविणे. तसेच इ.स. १८०५ मध्ये कलकत्त्या जवळच्या श्रीरामपूर या गावी पहिली छपाई कला अवगत केली. तेथे सेंट मॅथ्यूचे मराठी भाषेचे व्याकरण हे पुस्तक छापले गेले. इंग्रजांना भारतीयांशी व्यवहार करता यावा म्हणून इंग्रजांनी शाळा-कॉलेज सुरू केली. इ.स. १८५६ ला मुंबई विद्यापीठाची स्थापना केली. शाळा-कॉलेजमध्ये शास्त्री-पंडितांची मुले जावू लागली आणि शिकलेली मुले वाचू-लिहू लागली. मराठीत गदय वाङ्मय प्रथम निर्माण होवू लागले. परंपरेने चालत आलेले संतकाव्य, आख्यान काव्य, शाहिरी, लावणी वाङ्मय येथे थांबले व इंग्रजी वळणाचे गदय निर्माण होवू लागले.

'एकोणिसाव्या शतकापासून पुढचा सत्तर-ऐंशी वर्षाचा मराठी वाङ्मयाचा इतिहास म्हणजे ब्रिटिश राजवटीमुळे निर्माण झालेल्या नवसंस्कारांच्या क्रिया-प्रतिक्रियांच्या प्रारंभाचा व विस्ताराचा इतिहास होय.[२] ब्रिटिश राजवटीमुळे साऱ्या भारतीय जीवनात स्थित्यंतर घडून आले आणि त्याने एका कागदी वेगळ्या प्रकारच्या वाङ्मय निर्मितीला प्रेरणा दिली. म्हणूनच या राजवटी पासनूच्या पुढील कालखंडात निर्माण झालेल्या वाङ्मयाला अर्वाचीन वाङ्मयाचा कालखंड असे संबोधण्यात येते. येथे प्रस्थापित झालेल्या या नव्या राजसत्तेचा उगम एका व्यापारी संस्थेत असला तरी तिचे स्वरूप केवळ व्यापारी नव्हते. अथवा

आजपर्यंतच्या येथील इतर देशी-विदेशी सत्तांप्रमाणे केवळ राजकीय नव्हते. व्यापारी या राजकीय हेतूला सिध्दीला नेण्यासाठी का होईना पण पाश्चात्य संस्कृतीचा हेतू परस्पर प्रचार करणे हे ही तिचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट होते. संस्कृतीची मूल्ये व त्याच्या प्रचाराची साधने या सत्तेच्या छायेखालीच परिचित आणि उपलब्ध झाली. नवी शासन व्यवस्था, शिक्षण संस्था, मुद्रणालये, ग्रंथप्रसार, वृत्तपत्रे, ख्रिस्ती धर्मोपदेशक आणि एत्तदेशीय लोक यांनी या अनुसंधानाने केलेल्या सामुदायिक वा व्यक्तिगत हालचाली या सर्वांच्या क्रिया-प्रतिक्रियांतून या नव्या मूल्यांचे येथे कमी जास्त प्रमाणात संवर्धन होत गेले. जीवनाच्या राजकीय, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक अंगाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टीकोन त्यामुळे येथील लोकांना प्राप्त झाला. किंबहुना राजकीय क्रांती बरोबर एक प्रचंड मानसिक क्रांती येथे घडून आली. या सर्वाचा वाङ्मय निर्मितीवर परिणाम झाला. या कालखंडातील वाङ्मय निर्मितीच्या होत्या. या काळातील जनमनावर विशिष्ट प्रकारची सांस्कृतिक मुद्रा उटिविण्यासाठी चाललेल्या प्रयत्नांचाही वाङ्मय निर्मिती हा एक अविभाज्य घटक होता. या वाङ्मय निर्मितीच्या प्रेरणा पुढील प्रमाणे -

**मराठी वाङ्मय निर्मितीच्या प्रेरणा :-**

१) **इंग्रजी विद्येचा प्रभाव** –

इंग्रजांच्या शासन व्यवस्थेत इंग्रजी जीवनमानाचे, राहणीमानाचे, आचार-विचाराचे परिणाम भारतीय लोकांवर झाले. त्याचप्रमाणे इंग्रजी वाङ्मयाचे अनुकरण करण्यास भारतीयांनी सुरूवात केली. इंग्रजी कथा, काव्य, कादंबरी, नाटकाचे भाषांतर मराठीत होवू लागले. महाजन यांनी 'गोल्डन ट्रझेडी' चे 'कुसमांजली' नावाचे भाषांतर केले. किर्तीकर यांनी 'प्रिन्सेसचे' 'इंदिरा' नावाचे भाषांतर केले. प्रधान यांनी 'लेडी ऑफ द लेक'चे भाषांतर 'दैवश्रेणी'मध्ये केले. अशा प्रकारे इंग्रजी शिक्षणाच्या प्रचारातून-प्रसारातून भाषांतराची कला प्रसिध्द होवू लागली.

इंग्रजांनी आपल्यावर जो विजय मिळवला तो शस्त्राच्या बळावर नसून शास्त्राच्या बळावर हे ओळखणारी नव्या वृत्तीची माणसे महाराष्ट्रात हळूहळू तयार होवू लागली.[3] त्यांनी इंग्रजीचे (भाषेचे) महत्त्व जाणले आणि काळाला अनुरूप अशी जीवन पध्दती स्विकारली पाहिजे हे ओळखले. त्यामुळेच बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी, दादोबा पांडुरंग तर्खडकर, नाना शंकरशेठ, महात्मा जोतिबा फुले, न्यायमूर्ति रानडे अशी मोठ्या कर्तृत्वाची माणसे या संक्रमण काळात निर्माण झाली.

**२) ख्रिस्ती धर्म प्रसारक :-**

एकोणिसाव्या शतकात मात्र इंग्रजांच्या राजवटी बरोबरीने ख्रिश्चन धर्माचा प्रसार सुरू झाला. त्याचा समाजातही अनेकांवर परिणाम झाला. ख्रिस्ती धर्मोपदशेक किंवा मिशनरी हे हिंदू समाजातील गोरगरिबांची सेवा तळमळीने करत त्यांनी ठिकठिकाणी दवाखाने काढले आणि मुख्य म्हणजे अनेक शिक्षण संस्था सुरू केल्या. शिक्षणाच्या मागाने धर्मप्रसार ही गोष्ट आपल्याकडे नवीन होती. असा धर्मप्रसार करताना मूर्तिपूजा, जातिभेद, सोवळे-ओवळे आणि अनेक देव-देवतांची गर्दी यावर मिशनरी लोक टिका करीत असत. ख्रिस्ती धर्म हा सत्य, प्रेम, त्याग आणि सेवा यावर कसा आधारलेला आहे म्हणून तो कसा श्रेष्ठ आहे हे लहान मुलांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला जात असे. मुंबई, पुणे, सातारा, वाई, महाबळेश्वर, बेळगांव, अहमदनगर, नाशिक इत्यादी अनेक ठिकाणी अमेरिकन मिशनने आपले काम चालविलेले होते. या मिशनऱ्यांना अर्थातच इंग्रज सरकारचा पाठींबा होता आणि खर्च करण्यासाठी हवा तेवढा पैसा होता. त्यामुळे हिंदू धर्मातीलगोरगरिबांना आणि दलित वर्गाला पैशाच्या जोरावर ख्रिस्ती बनवण्यास मिशनऱ्यांना पुष्कळ यश आले. हिंदू समाज हा विषमतेवर आधारलेला आहे. या धर्मामुळे अनेक घातक रूढी टिकून राहिलेल्या आहेत. स्त्रिया आणि शुद्र यांचा या धर्मात कसा छळ होत आहे हे शिकलेल्या हिंदू लोकांच्या मनावर बिंबविल्यामुळे अनेक उच्चवर्णीय हिंदूंना हिंदू धर्माचा त्याग करून ख्रिस्ती धर्म स्विकारावा या दृष्टीने साहित्य निर्मिती होवू लागली.

ख्रिस्ती धर्म प्रसारासाठी 'बायबल'चे मराठीत रूपांतर इ.स. १८१३ मध्ये फादर स्टीफन यांनी केले. तसेच पुढे इ.स. १८५७ मध्ये बाबा पद्मणजीनी 'यमुना पर्यटन' ही सामाजिक कादंबरी हिंदू धर्माचा निषेध करणारी लिहली गेली.

**३) ज्ञानप्रसार :-**

ज्याला पूर्व परंपरा मुळीच नव्हती आणि नियतकालिके सुरू होताच ज्याचा प्रारंभ झाला आणि थोड्याच कालावधीत जो चांगलाच रूजला असा नवीन वाङ्मय प्रकार म्हणजे निबंध हा होय. देशाविषयाची, समाजाविषयी, भोवतालच्या घडामोडी विषयी गद्यामधून सुव्यवस्थितपणे काही विचार मांडता येतात आणि त्यांचा वाचकांच्या मनावर परिणाम होऊ शकतो हे या काळातल्या विचारवंत अशा लेखकांना नव्यानेच जाणवले. ज्ञानाच्या प्रसाराबरोबरच विचारांची देवाण घेवाण त्या काळातील बहुतेक सर्व नियतकालिके करू लागली. एवढेच नव्हे तर 'दर्पण' या पहिल्याच नियतकालिकापासून सर्वसामान्यवाचकही विविध विषयांवरची आपली मते नोंदवू लागले. भाऊ महाजन आणि शतपत्रे लिहिणारे लोकहितवादी हे सुरूवातीच्या काळातील मोठ्या योग्यतेचे निबंधकार ठरतात. मराठी ज्ञानप्रसारक आणि विविध ज्ञान विस्तार यामधूनही विचार प्रवर्तक असे अनेक निबंध प्रसिध्द झाले आहेत.

अशा प्रकारे इ.स. १८०० ते १९२० या कालखंडातील वाङ्मय निर्मितीच्या प्रेरणा होत्या. प्रेरणा अनुसरून कथा, काव्य, कादंबरी, नाटक तसेच नियतकालिक, वृत्तपत्रे याचा उदय झाला. यातील कादंबरी वाङ्मयाचा अभ्यास येथे करावयाचा आहे.

**'कादंबरी' या वाङ्मय प्रकाराचे स्वरूप :-**

अव्वल इंग्रजीतील कथा वाङ्मयातून कादंबरीची कल्पना रूजली आणि वाढली. कमीत कमी पात्रे व कमीत कमी घटना असतात. त्या वाङ्मय प्रकाराला लघुकथा म्हटले जात असे. १८०० ते १८७४ या कालखंडात कथा-कादंबरी असेच म्हटले जात होतो कारण या काळात कादंबरी कशाला म्हणायचे व कथा कशाला म्हणायचे या विषयी स्वरूप

ठरलेले नव्हते. कथा आणि कादंबरी हे सर्वस्वी स्वतंत्र भिन्न व प्रत्येकी स्वयंपूर्ण असे वाङ्मय प्रकार आहेत. कथेचे तंत्र निराळे, कादंबरीचे तंत्र निराळे हे आजचे सर्वसामान्य विचार अव्वल इंग्रजी काळात नव्हते. बाणभट्टांची कादंबरी किंवा सुबन्धूची 'वासवदत्ता' या दोनच कादंबऱ्या उल्लेखनीय आहेत. कारण आजच्या कादंबरी वाङ्मय प्रकाराचे विशिष्ट तंत्र जरी यामध्ये न आढळले तरी कादंबरी लेखनाचे पूर्वेकडील प्रयत्न या दृष्टीने यांचे कादंबरीच्या विकसनात महत्त्वाचे स्थान आहे. हिंदू स्थानातील प्राचीन काळच्या या एक-दोनच कादंबऱ्या उपलब्ध असून याशिवाय दुसऱ्या काही लिहिल्या गेल्या असल्यास त्या काळाच्या उदरात गडप झाल्या आहेत.

'कादंबरी' हा वाङ्मय प्रकार इंग्रजी राजवटीतच जन्माला आला. तसे पाहिले तर गोष्ट सांगणे आणि गोष्ट ऐकणे ही मानवाची प्रवृत्ती पुरातन आहे. पुराणे, आख्याने, बखरी इ. ग्रंथातून कादंबरीची काही अंगोपांगे जाणवतात हे खरे आहे. १९२९ मध्ये प्रसिध्द झालेल्या 'महाराष्ट्र भाषेचा कोष' या ग्रंथात असा एक अर्थ दिला आहे. यावरून सौ. कुसुमावती देशपांडे यांनी ''एका विशिष्ट तऱ्हेच्या कल्पित कथेला कादंबरी हे नाव मराठीत बऱ्याच आधीपासूनच रूढ असावे.'' असा जो तर्क केला आहे तो खरा असावा. कादंबरी या वाङ्मय प्रकाराचा उदय इंग्रजी वाङ्मयाच्या अनुकरणातून झाला आहे. या वाङ्मय प्रकाराचा उल्लेख इंग्रजीत 'नॉव्हेल' असा केला आहे. मराठीमध्ये 'नावल' हा त्यासाठीच शब्द वापरण्याचा प्रयत्न झाला पण तो रूढ झाला नाही. बाणभट्टांची 'कादंबरी' हाच शब्द पुढे रूढ झाला.

कथा-कादंबऱ्या एकत्रित आढावा घेताना कथा आणि कादंबरी हे सर्वस्वी स्वतंत्र आणि भिन्न व प्रत्येकी स्वयंपूर्ण वाङ्मय प्रकार आहेत. कथेचे तंत्र निराळे आणि कादंबरीचे निराळे हे आज मान्य झालेले विचार असले तरी या कालखंडातील वाङ्मयाशी सुसंगत नाहीत. अनेक कथा मिळून एक कादंबरी होत नाही. किंवा एका कादंबरीतून अनेक कथा तयार करता येणार नाहीत. हा तंत्रविचार पुस्तकी पांडित्याचा ठरावा असे पुरावे या काळात मिळतात. एक तर दशकुमारचरित्र किंवा अरबी गोष्टी किंवा पंचतंत्र हितोपदेश या पध्दतीच्या

साखळीच्या रचनेची विपुलता या काळात आढळते. दुसरे अनेक कादंबऱ्यातून सुट्टया कथांची सांधेजोड करण्याची पध्दतीही स्विकारलेली दिसते. तिची सुरूवात 'यमुना पर्यटना'पासूनची आहे. तेव्हा कथांच्या गुंफणीतून कादंबरीच्या रचनेकडे वळायचे. हा या काळातील बहुविध कादंबऱ्यांचा एक विशेष म्हणावा लागेल. हा प्रकार रचनाकारांच्या'आखुड' समजुतीतून उद्भवलेला असो की त्यांच्या पुढील धर्मकथांच्या वा कलाकथांच्या आदर्शामधून उद्भवलेला असो, मराठी कादंबरी ही कथेतून स्फरलेली वाढलेली आहे हे ऐतिहासिक सत्या नाकारता येणार नाही.[४]

**'कादंबरी' वाङ्मय प्रकाराचे प्रकार पुढील प्रमाणे :-**

१. भाषांतरीत कादंबरी

२. अद्भुतरम्य कादंबरी

३. ऐतिहासिक कादंबरी

४. सामाजिक कादंबरी

५. वास्तववादी कादंबरी

**१. भाषांतरीत कादंबऱ्या :-**

भिन्न भाषीय कादंबऱ्याची मराठी भाषांतरे वा रूपांतरे ही मराठी कादंबरीच्या क्षेत्रातील एक वेगळी पण बरीच रूळलेली वाट म्हणता येईल. मराठी कादंबरीच्या प्रारंभापासून ही वाट ठाऊक होती एवढेच नव्हे अशा भाषांतरापासूनच मराठी कादंबरीला प्रारंभ झाला.[५] कादंबरी वाङ्मयाला लागणारी सामग्री इंग्रजपूर्व काळातही मराठी वाङ्मय प्रकारात विखुरलेली होती.परंतु प्रत्यक्ष कादंबरीचा उगम मात्र अव्वल इंग्रजीमध्ये व इंग्रजी वाङ्मयाच्या संस्कारामुळे, अनुकरणामुळे झाला आणि प्रथमावस्थेत बऱ्याच इंग्रजी कादंबऱ्याची मराठी भाषांतरे झाली. यापैकी हरी केशवजी यांनी जॉन बन्थनच्या 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' चे भाषांतर 'यांत्रिकक्रमण' या नावाने प्रसिध्द केली. ही मराठीतील पहिली भाषांतरीत कादंबरी म्हणता येईल. कृष्णशास्त्री चिपळूणकरांचे 'रासेलच'चे भाषांतर यासारखी बोधप्रधान कादंबऱ्यांची

भाषांतरे झाली. इंग्रजी शिक्षणाच्या इंग्रजी नवीन अशा उपक्रमामुळे महाराष्ट्रीय मने ज्ञानलालसा बनली होती. कथा कादंबऱ्यांतूनही काही बोध घ्यावा किंवा दयावा अशा वृत्तीने प्रेरित होवून भाषांतरीत कादंबऱ्या लिहल्या गेल्या होत्या.

**२. अद्‌भुतरम्य कादंबऱ्या :-**

मराठी कादंबऱ्यांची सुरूवात अद्‌भुत व कल्पनारम्य कादंबऱ्यातच झाली. कल्पनारम्य कादंबऱ्यात प्रातिनिधकपणा आणण्याऐवजी सभोवतालच्या सृष्टीचा विसर पडावा हीच लेखकाची प्रवृत्ती विशेष दिसून येते. सृष्टीच्या कटू अनुभवाने शिणलेल्या मनास थोडावेळ का होईना, त्यांचा विसर पडावा आणि मन:कल्पित इष्ट सृष्टीत विहार करावयास लावल्यानेच त्याला दु:खद अनुभवाचा विसर पडावा म्हणुन लेखकानी अद्‌भुतरम्य कादंबऱ्या लिहावयास सुरूवात केली. प्रथम लक्ष्मणशास्त्री हळबे यांनी इ.स. १८६१ साली 'मुक्तामाला' ही कादंबरी लिहली. तसेच रत्नप्रभा, मंजुघोष, मंदाकिनी, चंपकम ाला, वसंतमाला या अद्‌भुतरम्य कादंबऱ्या लिहल्या.

या कादंबऱ्यांचा जन्मच एका परिने अद्‌भुतात झाला. कथानकास मनोवेधकता ज्या कित्येक साधनांचा उपयोग करता येऊ शकतो. त्यापैकी अद्‌भुत वातावरण हे सर्वात सोपे होय. पण बालमनाला अद्‌भुततेने मोहिनी घातली तरी त्यातील असंभाव्यता प्रसंग, सुंदर युवक-युवती अशा सत्यसृष्टीत क्वचित शक्य असणारच. अतएव विश्‍वसनीय वाटणाऱ्या गोष्टींना कथानकात आणून कल्पनेला लेखकाने वाव दिल्यास लेखकास अद्‌भुता इतकेच मनोहर पण विश्‍वसनीय वातावरण निर्माण करून वाचकास भुरळ पाडणे शक्य असते व वाचकांनाही पुष्कळदा असल्याच वातावरणाची आवश्यकता असते. रोजचे बेसूर रडगाणे तर आहेच पण थोडावेळ काल्पनिक का होईना पण गंधर्व नगरीतील सुरेल गाण्याची लकेर ऐकावयास मिळाली तर मनास विरंगुळा मिळेल या भावनेनेच पुष्कळदा वाचक वर्ग असल्या गोष्टीकडे वळतो. व त्यामुळेच वास्तववादाचा कितीही प्रचार झाला तरी कल्पनारम्य कादंबऱ्या लोकप्रियच होत राहिला.

३. **ऐतिहासिक कादंबऱ्या :-**

मराठी ऐतिहासिक कादंबऱ्यांची सुरूवात वास्तविक सामाजिक कादंबऱ्यांच्याही पूर्वी झाली. अद्भुतांचे युग संपताना काल्पनिक राजाराणीच्या गोष्टी ऐकून कंटाळलेल्या मनास ऐतिहासिक कालात नेऊन खऱ्या खुऱ्या राजा-राणीच्या व थोर पुरूषांच्या चरित्रातील अद्भुत व रोमांचकारी घटना ऐतिहासिक कादंबरी लेखनास सुरूवात झाली. काळ ही अशा प्रवृत्तीस अनुकूलच होता. १८५७ चे बंड नुकतेच होऊन लोकांचे लक्ष साहजिकच राजकीय परिस्थितीकडे जोराने आकर्षित होऊन जुन्या व नव्या राजवटीची मनोमन तुलना करण्यात गुंतले होते. मराठी राजाच्या इतिहासाविषयी नवीन जागृती उत्पन्न होऊन ग्रॅन्ट डफच्या इतिहासावरील कीर्तन्यांचा टिकात्मक निबंध याच सुमारास लिहला गेला. मराठी दरबारा विषयीच्या भ्रामक कल्पना दूर करून त्यांचे सत्य स्वरूप दाखविण्याचा प्रयतन त्यांच्याच बंधूंनी 'थोरले माधवराव पेशवे' हे पहिले ऐतिहासिक नाटक लिहले तर इ. सन १८७१ मध्ये रा.भि. गुंजीकरांनी 'मोचनगड' ही मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी लिहली.

रा. भि. गुंजीकरांनी घातलेली ऐतिहासिक कादंबऱ्यांची परंपरा हरिभाऊंनी पुढे चालविली. त्यांनी 'संभाजी', 'चितुरगडाचा वेढा', पानिपतच्या मोहिमेतली 'उषःकाल', 'सूर्यग्रहण', 'रूपनगरची राजकन्या' ह्या कादंबऱ्या लिहल्या. तसेच श्री. वि. वा. हडप, नाथमाधव यांनीही ऐतिहासिक कादंबऱ्या लिहल्या.

ऐतिहासिक कादंबरीत लेखकाचे चातुर्य वातावरणाच्या किंवा पार्श्वभूमीच्या द्वारे सत्याभास निर्माण करण्यात दिसून येते. ऐतिहासिक कादंबऱ्यांचे लेखक कथा सुत्राच्या निमित्ताने वाचकांना एका जुन्या काळात नेतात. त्यासाठी कथानकाची पार्श्वभूमी अशा कलात्मकतेने चितारणे जरूर असते की, क्षणभर वाचकास आपण त्या काळात वावरत आहोत असा भास व्हावा. त्यासाठी लेखकाला ज्या विशिष्ट काळाचे युगवैशिष्टये समजून घेऊन आत्मसात करणे जरूर पडते. त्यासाठी तत्कालित ग्रंथ,बखरी, पत्रे याचा अभ्यास करून त्या वेळच्या समजुती, पोषाख, आचार-विचार इतकेच नव्हे तर विशिष्ट भाषा प्रयोग

लेखकाला नीट समजले असते अथवा थोडक्यात त्या काळाशी लेखक समरस झाला असेल तरच त्याला ऐतिहासिक कादंबरीत वास्तवता आणता येते. अशा प्रकारे कालखंडातील ऐतिहासिक कादंबऱ्या ह्या १९२० नंतर लिहल्या गेलेल्या पौराणिक कादंबऱ्याचा पाया घातला गेला.

**४. सामाजिक कादंबऱ्या :-**

ऐतिहासिक कादंबऱ्या आपणांस भूतकालीन समाजाचे चित्र काढून देऊन तत्कालिन परिस्थितीवर व जीवनावर प्रकाश टाकतात. तर सामाजिक कादंबऱ्या भोवतालच्या सृष्टीचे व सद्य:कालीन आणि क्वचित प्रसंगी भावी समाजाचे चित्र रंगवितात. जुन्या युगातील सामाजिक कादंबऱ्या या त्या-त्या युगाचे सामाजिक इतिहासच होत. व या दृष्टीने सामाजिक कादंबऱ्या इतिहासाचे अंग एकवेळ होऊ शकतील पण ऐतिहासिक कादंबऱ्या व सामाजिक कादंबऱ्या हे कादंबऱ्याचे प्रकार मात्र परस्पराहून बरेच भिन्न आहेत. भूतकाळाचे व वर्तमानकाळाचे चित्र रंगविताना कादंबरीकाराच्या भूमिकेमुळे फरक पडणार हे उघडच आहे. प्रतिभेच्या साह्याने भूतकाळाचे चित्र डोळ्यापुढे आणून त्यातील निरनिराळ्या प्रसंगाचा व घटनांचा योग्य अर्थ लावून त्यांची सुसंगती दाखविणे व संदिग्ध स्थळावर प्रकाश टाकणे हे ऐतिहासिक कादंबरीकाराचे कार्य असते. तर सभोवतालच्या समाजाचे सुक्ष्म अवलोकन करून त्यातील वर्तमान व भावी अन्त:प्रवाहाची दिशा व्यक्त करून समाजाचे चित्र रंगविणे हे सामाजिक कादंबरीकाराचे साध्य असते. दोघांच्या भूमिकेतील चित्रण पध्दतीत मूलत:च भेद आहे. ज्या सामाजिक जीवनाचे चित्र सामाजिक कादंबरीकार देत असतो त्या जीवनातील तो एक स्वतंत्र विचारशील घटक असल्याने चित्रांवर त्याच्या व्यक्तीत्वाचा ठसा अगदी स्वच्छ उमटणे अपरिहार्यच होते. हा ऐतिहासिक कादंबरी व सामाजिक कादंबरीतील मुख्य फरक आहे.

तत्कालिन समाजातील चाली-रीती, रूढी-परंपरा, आचार-विचार यांचे प्रकटीकरण कादंबऱ्यातून होऊ लागले. वर्णव्यवस्थेवर आधारित समाजात स्त्रिया व बहुजन समाज यांचे होणारे शोषण कादंबऱ्यातून मांडण्याचा प्रयत्न केला गेला.

बाबा पद्मणजी यांनी इ.स. १८५७ ला 'यमुना पर्यटन' ही पहिली सामाजिक कादंबरी लिहिली. हिंदू धर्मात विधवा स्त्रियांच्या दु:खाचे जीवन चित्रित केले होते. तसेच रहाळकरांनी 'नारायणराव आणि गोदावरी' (१८७९) लिहिली. गणेश महादेव लिमये यांनी 'वेणू'(१८८६) मध्ये लिहिली.

अशा प्रकारे समाजाचे सामाजिक जीवनाचे चित्रण करण्यासाठी कादंबरी हा वाङ्मय प्रकार हा अतिशय महत्वपूर्ण झाला.

**५. वास्तववादी कादंबऱ्या :-**

वास्तववादी कादंबऱ्या या एका अर्थी कल्पनारम्यतेच्या विरूध्द टोकच होय. कारण अशा कादंबरी लेखनाच्या मुळाशी सभोवतालच्या सृष्टीचे यथार्थ चित्रण करण्याची प्रवृत्ती असते. पण इतके असूनही वास्तववादी संप्रदाय इतका सर्वव्यापी आहे की, परस्पराहून अगदी भिन्न अशा प्रकारच्या कादंबऱ्यांचा यात समावेश होतो.

काल्पनिक कादंबऱ्यांची प्रतिक्रिया म्हणूनच वास्तववादी कादंबरी जन्मास येते. सामान्य घरगुती जीवनाची चित्रे देणाऱ्या कादंबऱ्या याच वर्गात मोडतात. त्याचबरोबर वास्तववादी कादंबऱ्यांचे ध्येय वस्तुस्थितीचे यथार्थ चित्रण करणे हेच असले तरी नुसते तेवढेच करून त्या थांबत नाहीत. सभोवतालच्या सृष्टीकडेच मनुष्य वळला म्हणजे तो साहजिकच चिकित्सक बनून आत्मपरिक्षणाची प्रवृत्ती त्याच्यात उत्पन्न होते. दुरून डोंगर साजरे असले तरी प्रत्यक्ष चढण आली म्हणजे आपणास ज्याप्रमाणे खाचा खळगे व काटेरी झाडेझुडपे दिसू लागतात तद्वतच कल्पनारम्य वातावरणातून सत्यसृष्टीत लेखकाने प्रवेश केला म्हणजे समाजातील निरनिराळे दोष व उणिवा यांची स्पष्ट कल्पना येते व समाजास प्रतिदिन भेडसावणाऱ्या विविध प्रश्नाकडे कादंबरीकाराचे लक्ष वळते. म्हणून वास्तववादी कादंबऱ्या लिहित असताना उपहास पध्दतीने दोषाविष्करण करण्याची किंवा समाजातील विस्कटलेल्या घडीच्या मुळाशी असणारी कारणे हुडकून काढून त्यांच्या परिहाराचे उपाय सूचविण्याची त्याला इच्छा

होते व त्यामुळेच वास्तववादी संप्रदायात आपणास टीकात्मक व प्रश्नात्मक अशा दोन प्रकारच्या कादंबऱ्या प्रामुख्याने आढळतात.

वास्तववादी संप्रदायात युरोपात औद्योगिक क्रांती व शास्त्रीय संशोधनाच्या काळातच सुरूवात झाल्याने यथार्थ, वस्तुचित्रणाबरोबर समाजातील तळाच्या लोकांच्या जीवनाची चित्रे रेखाटणे व श्लील-अश्लील ही बंधने झुगारून देऊन समाजाच्या जीवनाच्या सर्व अंगाचे यथार्थ चित्र देणे ही वास्तवतेची आवश्यक अंगेच होऊन बसली.[६] अशा तऱ्हेने मराठी वाङ्मयात जोरवेकरांनी 'विचित्रपुरी' (१८७०) मध्ये वास्तववादी कादंबरी लिहिली. वि.को. ओक यांनी 'शिरस्तेदार'(१८८१), 'शिक्षक' (१८८३) मध्ये लिहिली. पुढे हरिभाऊ आपट्यांनी 'मधली स्थिती' व 'पण लक्षात कोण घेतो' या वास्तवदर्शी कादंबऱ्या लिहिल्या. 'पण लक्षात कोण घेतो'मधील यमूचे दु:ख खूप मोठे व भयानक आहे. अशा वास्तवदर्शी कादंबऱ्या लिहिल्या गेल्या.

अशा प्रकारे मराठी वाङ्मयामधील कादंबरी क्षेत्रात कादंबरी वाङ्मयाच्या उगमापासून म्हणजे इ.स. १८०० ते १९२० या कालखंडातील कादंबरी वाङ्मयात निर्माण झालेले विविध प्रकार या प्रकारामधून सर्व लेखकांनी केलेले लेखन खूप महत्त्वपूर्ण ठरले. परंतु इ.स. १९२० च्या दरम्यान मराठी वाङ्मय क्षेत्राला पूर्णपणे कलाटणी मिळाली. व वाङ्मय क्षेत्रात बदल झाले.

**इ.सन १९२० च्या दरम्यान मराठी कादंबरीचे बदलते स्वरूप :-**

इ.स. १८५० नंतर पहिली कादंबरी जन्मास आली. तेव्हा इंग्रजी राज्य, इंग्रजी विद्या, इंग्रजीचे कायदे, ख्रिस्ती धर्माचा मिशनऱ्यांमार्फत होणारा जोराचा प्रसार इत्यादी कारणांनी उद्भवलेले सामाजिक संक्रमण साक्षर व जनतेला जाणवू लागलेले होते. त्यावेळी विधवा विवाह, स्त्रियांचे शिक्षण, वधूवरांच्या संमतीचे विवाह असल्या विषयांनी लोकांचे मन भारावलेले होते. पुढे सामाजिक समतेच्या सर्वांगिण व्यवहाराची आवश्यकता साक्षरांपैकी अनेकांच्या मनाला जाचू लागली. तथापि समाजाच्या तळापर्यंत या आवश्यकतेची झळ

पोचली नसल्याने सामाजिक स्थित्यंतराच्या बारीक अभ्यासातून उदयास आलेल्या कादंबऱ्यांना ब्राह्मण समाजाच्या कारभारापलीकडे उडी घेता आली नाही. गेल्या शतकाच्या अखेरीस राजकारणाने समाज सुधारणेच्या चळवळींना मागे रेटले. विसाव्या शतकाच्या प्रारंभी राजकीय चळवळीना विलक्षण प्रखरता चढली. या प्रखरतेला स्वाभिमानप्रचुर इतिहास कथांनी गवसणी घालण्याचा प्रयत्न केला. १९२० ला भारताच्या राजकारणात गांधीवाद आणि रशियात राज्यारूढ झालेला साम्यवाद असे दोन विचारप्रवाह एकमेकांशी चढाओढ करीत पुढे आले. १९१४-१९१८ या चार वर्षातील पहिल्या जागतिक महायुध्दाने महाराष्ट्रातील कारकुनी पेशाच्या मध्यम वर्गाचे नशीब काहीसे अनपेक्षितरित्या उघडले. त्याला द्रव्यचे बाळसे लाभल्यामुळे निराळ्या तऱ्हेच्या सुखविलासी वाङ्मयाची रूची त्यामध्ये बळावली व ही रूची तृप्त करणाऱ्या वाङ्मयाने (अर्थात कादंबऱ्यांनी)डोके वर काढले आणि त्याचा बोलबालाही झाला. याचवेळी म्हणजे १९२० पासून पुढे दलितोध्दाराच्या ध्येयाला गांधीवाद व साम्यवाद यांची दुहेरी धार चढली व तिचे महत्त्व ज्यांच्या हृदयाला स्पर्श करीत होते त्या लेखन कुशलांनी त्या ध्येयाची आपल्या ज्ञानबळानुसार कादंबरी द्वारा उपासना चालविली. त्यांच्या ज्ञानबळात प्रत्यक्ष अनुभवाचा जिवंतपणा नसल्यामुळे परिणामकारकतेच्या अंगाने ही उपासना दुबळी ठरली. ही तुटपुंज्या किंवा उसनवारीच्या भांडवलाची उपासना एकीकडे अहमहमिकेने चालू असता दुसरीकडे वर्ण्य विषयाच्या साक्षात अनुभवाच्या होतकरू व्यक्ती कादंबरी क्षेत्रात उतरल्या व त्यांनी पूर्वीच्या मृगजलप्राय कादंबरी वाङ्मयाचे भ्रामक दिखाऊपणाचे सोंग उघडकीस आणले. या व्यक्ती अगदी थोड्या आहेत व त्यांनी केलेले महत्वपूर्ण ठरले आणि यातून राजकीय कादंबऱ्या आणि पौराणिक रूपकात्मक कादंबऱ्या निर्माण झाल्या होत्या. पण येथे पौराणिक कादंबऱ्यांचा अभ्यास करावयाचा आहे.

**मराठीतील पौराणिक कादंबऱ्यांची वाटचाल :-**

साऱ्या जगभर पुराण-कथांना महत्वाचे स्थान आढळते. शॉ सारखा नाटककार, जॉईस सारखा कादंबरीकार व इलिएट सारखा कवी या सर्वात 'पुराण-कथांनी' आकर्षून घेतले. मराठीत व विशेषत: भारतात 'पुराणप्रियता' या संदर्भात स्पष्टच दिसते. खाडीलकरांसारखा नाटककार, खांउेकरांसारखा कांदबरीकार व मर्ढेकरांसारखा कवी हे त्रिकुट उपरिनिर्दिष्ट इंग्रजी त्रिकुटाशी ताडून पाहता येईल. पुराणे रचणारे व पुराणे सांगणारे यांच्या भूमिका एक नाहीत. सांगणारांनी श्रोत्यांची नाडी ओळखून त्यात अद्‌भुतरम्यता व शृंगार यांच्या टिप्पण्या जोडल्या असतील; त्याचा परिणाम म्हणजे 'पुराण-कथा' ह्या बालीश अथवा कल्पनाकल्पित वाटू लागल्या. ह्या पुराणकथांमागे मानवी जीवनाचे दर्शन आहे. मानवांचा उभा आडवा छेद घेऊनही भावनेचा एकच पट निर्मिण्याची शक्ती आहे हे लक्षात यायला थोडा वेळ लागला. मात्र अभिरूचीत या कथांमागचे मन सापडले की, त्या मनाला वेळोवेळी नवा अर्थ सुचतो व हा अर्थ व्यक्त होत असतानाच 'नवे साहित्य' निर्माण होऊन त्यातून पौराणिक कादंबऱ्यांचा उगम होवू लागला.

काळाकाळातून मानवी जीवनाचे चित्र थोडफार पालटते व थोडेफार तसेच राहते. बदलले तरी दुष्काळात कुत्र्याचा पाय चाटणारा विश्वामित्र असहाय्य मानवाचे दर्शन नेहमी घडवितो. जीवनातल्या एका मोठ्या चिरंतन मूल्याचा अर्थ कळतो व अन्न हे ब्रह्म कसे ते पटते. तोच असहाय्य विश्वामित्र स्वबलावर, तपोबलावर, त्रिशंकूला सदेह जिवंत स्वर्गात नेण्यासाठी ठाण मांडतो. येथे मानवी जीवनातील वेगळ्या अचाट पण प्रयत्नशील मूल्याचे दर्शन घडते. 'कर्ण हा पांडव झाला असता तर आपला पतीच झाला असता' या द्रौपदीच्या विचारात मनाच्या सुप्त कोपऱ्याचे दर्शन होते. आणि तोच कर्ण अपराधी कुंतीला 'मी फक्त अर्जुनाला मारीन व पाच पांडव ही संख्या कायम राखीन'. असे सांगतो तेव्हा स्वभावाशी उदारता व आत्मशक्तीची जाणीवच प्रत्ययास येते. ही सारी पुराणे नुसत्या भाकडकथा म्हणून वाचावयाच्या नव्हेत हे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस व विसाव्या शतकात आपल्याला

कळते. साध्या भाकडकथा म्हणुन पुराणाकडे पाहणारे वाचक, पुराणे ही वेदाइतकी अक्षरश: सत्य मानणारे जुने पुराणिक. आपल्या अन्य आशयासाठी कथांचा उपयोग करणारे रूपककार व संपूर्णपणे तोच आशय वेगळ्या दृष्टीकोनातून पाहणारे लेखक अशा चार प्रकारांनी ह्या पुराणकथांचा अन्वयार्थ लावण्यास सुरूवात झली.[७]

चरित्रपर ऐतिहासिक कादंबरी प्रमाणेच मराठीत आजकाल पौराणिक कादंबरी लोकप्रिय होत आहे. पौराणिक कादंबरीला ऐतिहासिक कादंबरीचाच एक उपविभाग मानले तरी तिचे स्वरूप ऐतिहासिक कादंबरीहून भिन्न आहे. ज्ञात इतिहासाच्याही पूर्वीच्या युगाचे दर्शन पौराणिक कादंबरी वाचकांना घडविते. ग्रंथबाह्य जी अन्य साधने ऐतिहासिक कादंबरीकाराला उपलब्ध असतात ती हाताशी असल्याने पौराणिक कादंबऱ्यांच्या लेखकांना सत्याभास निर्माण करण्यासाठी स्वत:च्या कल्पनाशक्तीवरच विसंबून राहणे भाग पडते. तसेच कथेतील घटनांच्या वास्तवतेसंबंधी मतभेदाला पौराणिक कादंबरीत विशेष वाव नसल्याने घटनांच्या निवेदन पध्दतीला, अन्वयार्थाला व व्यक्ती रेखाटनाला साहजिकच महत्व अधिक येते.

महाकाव्यातील सर्वच घटना लोकांना विश्सनीय वाटू लागल्या. या महाकाव्याच्या द्वारे पुढील अनेक पिढ्यांतील ललित-लेखकांना कथाबीजांच्या रूपाने एक अमूल्य ठेवा वारसा हक्काने मिळाला. महाकाव्यातील व पुराणांतील कथासूत्राच्या आधार वर अनेक काव्ये व नाटके भिन्न भाषांतून रचली गेली आहेत. मुक्तेश्वर, मोरोपंतादी मध्ययुगीन कवींनी अथवा अनेक अर्वाचीन कवींनी, लेखकांनी महाकाव्यातील अथवा पुराणातील कथासूत्रांच्या आधारावर जी काव्यनिर्मिती, कादंबरी निर्मिती करून मराठी वाङ्मयात मोलाची भर टाकली.

जीवनातील परिस्थिती व समस्या यांची उत्तरे देण्यासाठी कथावस्तूंचा उपयोग करणे हा एक पौराणिक कादंबऱ्यांचा उद्देश आहे. सर्व प्रथम 'सत्यवान सावित्री' (१९११) ही पहिली पौराणिक कादंबरी लिहली गेली. यानंतर श्री. ना.के. बेहेरे यांनी 'सीता

वनवास'(१९१२), 'अहिल्योध्दार' या पौराणिक कादंबऱ्या लिहिल्या होत्या. वामन मल्हार जोशी यांची 'आश्रमहरिणी' (१९१६) पौराणिक रूपकात्मक कादंबरी लिहिली. 'आश्रमहरिणी' ही पहिली पौराणिक रूपकात्मक कादंबरी लिहिली होती. तसेच साने गुरूजींनी 'आस्तिक' कादंबरी लिहिली. श्री. माडखोलकरांनी 'शाकुंतल' कादंबरी लिहिली. यानंतर वि.स. खांडेकरांनी १९५९ मध्ये 'ययाती' पौराणिक रूपकात्मक कादंबरी लिहिली.

वा.म. जोशी यांनी पहिल्या महायुध्दानंतर व इंग्रजी सत्तेच्या वर्चस्वाखाली तत्कालिन सामाजिक व राजकीय परिस्थितीचा विचार करून 'आश्रमहरिणी' ही कादंबरी कल्पनेने पुराण निर्माण करून पौराणिक रूपकात्मक कादंबरी लिहिली आणि पुन्हा जवळ – जवळ ४० वर्षानंतर म्हणजे दुसऱ्या महायुध्दानंतर व देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर (१९५९) मध्ये वि.स. खांडेकरांनी 'ययाती' ही तशाच पध्दती पौराणिक रूपकात्मक कादंबरी लिहिली. अशा भिन्न काळात लिहिल्या गेलेल्या कादंबरीचा अभ्यास व कारणमिमांसा केली पाहिजे.

**वामन मल्हार जोशी यांची 'आश्रमहरिणी' पौराणिक कादंबरी :-**

मराठी कादंबरी वाङ्मयात स्वतंत्र युग निर्माण करण्याचे श्रेय प्रा. वा.म. जोशी यांना आहे. कारण मराठीत स्वतंत्र तात्विक कादंबऱ्यांस खरी सुरूवात त्यांनीच केली. प्रा. जोशी यांनी आपल्या कादंबऱ्यांतील मूलग्राही तत्वशोधनाने व विविध सामाजिक, धार्मिक व तात्विक प्रश्नांच्या साधकबाधक चर्चेने मराठी कादंबरीचा दर्जा वाढविला. वा.म. जोशी यांनी प्रत्येक कादंबरीतून सामाजिक प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला होता. स्त्री शिक्षणाचा प्रश्न, बालविवाह, विधवा विवाह, वाढत्या वयानुसार विवाहाचे प्रश्न अशा प्रकाराचे प्रश्न तात्वीक पध्दतीने कादंबऱ्यांतून मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या वेगळ्या पध्दतीच्या आहेत.

कादंबरी लेखनाच्या पध्दतीतही त्यांनी नवीन व यशस्वी प्रयोग केले आहेत. 'रागिणी' ही कादंबरी त्यांनी वैहायस पध्दतीने लिहिली. तर 'सुशिलेच्या देवा'त प्रस्तावनेत

म्हटल्याप्रमाणे त्यांनी दु:खात्मक पध्दतीचा प्रयत्न केला. मराठीतील पत्रलेखनात्मक कादंबऱ्यांचा पायंडाही त्यांनी 'इंदू काळे व सरला भोळे' ही कादंबरी लिहून पाडला आणि 'आश्रमहरिणी' पौराणिक रूपकात्मक कादंबरी लिहिली.

'आश्रमहरिणी' (१९१६) ही वामन मल्हारांची लघु कादंबरी इतर सर्व कादंबऱ्यांपेक्षा वेगळ्या प्रकारची आहे. ती आकाराने केवळ एखाद्या दिर्घकथेएवढी आहे. परंतु पूर्ण विकसित कथानक, स्वभाव चित्रण व कथेशी एकजीव झालेले, कथेच्या प्रकृतीने निर्मिले गेलेले वातावरण या तंत्रविषयक अंगांच्या दृष्टीने पाहिले तर ती एक स्वयंपूर्ण व यशस्वी कादंबरी आहे. आश्रमाचे वातावरण निर्माण करण्यात धौम्य, गभस्तिगती आदिकरून बालगोपालांच्या लीलांचे वर्णन करण्यात, वाढत्या वयाचे त्यांचे प्रश्नोप्रश्न सहृदयतेने मांडण्यात वामन मल्हारांचे चित्त रंगून जाते. या कार्यासाठी ते वेगळीच शब्दकळा वापरतात, वेगळ्या प्रतिमा सृष्टीचा व वाणीच्या जाणकारांचा अवलंब करतात व प्रारंभापासून अखेरपर्यंत हे वेगळेपणाचे विश्व कायम ठेवतात. कथेच्या प्रारंभी जो आश्रमीय जीवनाचा आभास त्यांनी निर्माण केला त्याचा भंग होईल असा एक शब्द किंवा एक विचारही ते या कथेत शिरू देत नाहीत. कथेच्या शेवटी सुलोचनेचा पुनर्विवाह व तिचे द्विपतिकत्व याची हकीकत येते. परंतु कथेला प्रारंभ झाला तोच नारदांनी धौम्य ऋषींना विचारलेल्या स्त्रीधर्म विषयक प्रश्नाने.''धौम्य ऋषींनी तो प्रश्न ऐकून डोळे मिटून क्षणभर ध्यान केले व नंतर लांब व दीर्घ उसासा टाकून अति गंभीर परंतु जरा उदास स्वराने'' आपली कथा सांगण्यास प्रारंभ केला. त्या क्षणापासून कथेविषयी कुतूहल वाटते; तिच्यातील प्रसन्न व दूरस्थ वातावरणाने मन भुलून जाते; नीटस शब्दकळेने व गंभीर वाक्यरचनेने आल्हाद वाटतो. वामन मल्हारांनी आपल्या मूळ प्रकृतीस अनुसरून एका विशिष्ट तत्वाच्या – द्विपतिकत्वाच्या – प्रतिपादनासाठी म्हणून ही कथा लिहावयास घेतली. ती शेवटाला जाण्यापूर्वीच त्या तत्वाचे प्रतिपादन करावे की नाही याविषयी त्यांना शंका वाटू लागली. पहिल्या आवृत्तीत त्यांनी त्या तत्वाला दडवून ठेवले, परंतु पुन्हा पुढील आवृत्तीत त्याला कुशलपणे व संयमित वृत्तीने पुढे

आणले, व असे करताना कथेतील आभासाच्या विश्वाला धक्का लागू दिला नाही. धौम्याचा वृत्तिविकास, त्याचे इतर छात्रांशी, कुलपतीशी, सुलोचनेशी आलेले भावसंबंध या सर्वाचे मोठे मनोहर चित्रण वामन मल्हारांनी या कथेत साधले. लहान प्रमाणात का होईना पण एका विशिष्ट जीवन प्रकारात रंगून त्यातील भावसंबंधाचे चित्रण करण्याचा प्रयत्न केल्यास वामन मल्हारांना ते किती साधणे शक्य होते याची 'आश्रमहरिणी'मध्ये स्पष्ट साक्ष पटते.

अशा प्रकारे वि.स. खांडेकरांनी लिहलेल्या ययाती कादंबरीचा पाया वा.म. जोशी यांच्या 'आश्रमहरिणी' या कादंबरीने घातला होता.

**इ.स. १९३५ नंतर मराठी पौराणिक कादंबरीचे बदलते स्वरूप :-**

कोणतीही कादंबरी ही सामाजिक जीवनाचे किवा अनुभवाचे चित्रण असते. भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले. याच दरम्यान १९४० ते १९४५ मध्ये जगात दुसरे महायुध्द झाले. त्यामुळे जगामध्ये या कालखंडात खूपच उलथापालथी झाल्या. त्याचे परिणाम म्हणून भारताच्या व महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय वातावरणात कितीतरी बदल घडून आला. देश स्वतंत्र झाला खरा पण स्वराज्याचे रूपांतर सुराज्यात करणे अत्यंत गरजेचे होते--- त्या दृष्टीने काही प्रयत्न झाले -- पण त्या प्रयत्नांना फारसे यश प्राप्त झाले नाही. उलट महागाई, भ्रष्टाचार वाढला आणि या महागाईत गरीब दरिद्री मनुष्य दारिद्रयाच्या खाईत ओढला. गरीब जास्त गरीब होवू लागले. तसेच शिक्षणाचा प्रसार खेडोपाडी झाला. --- भौतिक क्षेत्रात प्रचंड प्रगती झाली --- पण या प्रगतीने माणूस सुखी होण्याऐवजी दु:खी झाला.--- असा दु:खी मनुष्य कर्तृत्वहीन होऊन विषय वासनेचा बळी पडून भोगलंपट झालेला मनुष्य दुबळा बनला, दिशाहीन बनला असा हा दुबळा मनुष्य साहित्याचा विषय बनला आणि निरनिराळे कादंबरी वाङ्मयाचे प्रकार उदयाला आले त्याच बरोबर पौराणिक आशयावर आधारित पौराणिक कादंबरी लिहल्या गेल्या. उदा. 'स्वामी', 'श्रीमान योगी', 'झेप', 'मृत्युंजय', 'झुंज', 'पुत्र मानवाचा', 'दुर्दम्य', 'अमृतपुत्र', 'ययाती' अशा पौराणिक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या.

उपेक्षितांच्या समुहमनाचे दु:ख चित्रित करण्याचा प्रयत्न पौराणिक कादंबऱ्यांनी केला आहे. पुराण कथेला वर्तमानाचा अर्थ देण्याचा, पुराणातील व्यक्ती रेखांना अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला गेला आहे. तसेच पौराणिक इतिहासाच्या/आशयाच्या पार्श्वभूमीवर या कादंबऱ्या लिहल्या गेल्या. त्यातून पौराणिक व्यक्तीमधील 'माणूस' शोधण्याचा प्रयत्न केला गेला. अशा प्रकारे पौराणिक कादंबऱ्यांना वाङ्मयात विशिष्ट प्रकारचे स्थान मिळाले. या कादंबऱ्यापैकी वि.स. खांडेकरांच्या 'ययाती' कादंबरीचा अभ्यास येथे करावयाचा आहे.

**वि.स. खांडेकरांची ययाती पौराणिक कादंबरी :-**

वि.स. खांडेकर हे जीवनवादी संप्रदायाचे पुरस्कर्ते होते. कला ही जीवनासाठी आहे आणि तिचा उपयोग मानवी जीवनाच्या सुखासाठी व्हावा या हेतूने खांडेकरांनी वाङ्मयीन लेखन केले. जीवनावर प्रेम करणाऱ्या खांडेकरांनी ध्येयवाद जपण्यासाठी लेखन केले. नाटक, टीका, विनोद, कविता, लघुकथा, लघुनिबंध अशा विविध वाङ्मय प्रकारात त्यांनी लिखाण करून अखेर कादंबरीच्या क्षेत्रात पदार्पण केले. हृदयाची हाक, कांचनमृग, दोन ध्रुव, उल्का, हिरवा चाफा, दोन मने, क्रौंचवध इ. अनेक कादंबऱ्या त्यांनी लिहल्या. खांडेकरांचे लेखन हे ध्येयवादातून व जनसामान्याच्या तळमळीतुन उत्पन्न झाले आहे. स्वभावत:च खांडेकर हे हळव्या मनाचे असल्याने त्यांच्या कादंबऱ्यातून आदर्शवाद नेहमीच पहावयास मिळतो.

उच्च नैतिक आणि सांस्कृतिक मूल्यांवर श्रध्दा, विचारातील नाविन्य आणि तांत्रिक निर्दोषिता यांचा त्रिवेणी संगम खाडीलकरांच्या कादंबऱ्यात झाला आहे. संस्काराच्या दृष्टीने खांडेकरांच्या कादंबऱ्या उच्च दर्जाच्या आहेत.

१९५० नंतर एक आर्थिक आणि दुसरे सांस्कृतिक अशी दोन शकले परस्परविरूध्द दिशेला फेकली गेल्यामुळे मध्यमवर्ग निर्जीव बनत चालला आहे ही गोष्ट उघड आहे. त्याने जो माणुसकीचा दिवा पिढ्यान्‌पिढ्या हातात धरला आहे तो कधीही विझू नये एवढी दक्षता त्याने घ्यायला हवी. या वर्गाचे खरे वैभव ते आहे. भारतीय संस्कृतीचा सर्वश्रेष्ठ वारसा

तेवढाच आहे. मुत्सदी 'मानवाला सुखी करण्याकरिता' युध्दाच्या खाईत केव्हा लोटतील याचा नेम नाही. अशा स्थितीत माणुसकीचा आधार एकच आहे. तो म्हणजे संस्कृतीची सारी मूल्ये सांभाळण्याकरिता धडपडणारा तडफडणारा सामान्य माणूस'. तात्पर्य, सभोवतालच्या हतोत्साह करणाऱ्या परिस्थितीतही शाश्वत मूल्यांवर आणि उच्च नैतिक व सांस्कृतिक तत्वावर खांडेकरांची श्रध्दा अढळ आहे. या दृष्टीनेच खांडेकरांनी १९५९ मध्ये 'ययाती' पौराणिक कादंबरी लिहिली आणि त्या कादंबरीतील कच हा मानव संस्कृतीचा त्राता आहे व शुक्राचार्यासारख्या आसुरी व पाशवी शक्तीच्या प्रतिकाराशी टक्कर देण्यास तो समर्थ आहे हे त्यांनी कादंबरीतून पटवून दिले आहे.

खांडेकरांच्या स्वत:च्या मते ययाती ही कादंबरी जर त्यांनी १९४२ पूर्वी लिहिली असती तर शर्मिष्ठेच्या प्रेमाची कहाणी असेच या कृतीचे स्वरूप राहिले असते. पण १९४२ ते १९५२ या दशकातील भौतिक प्रगती व नैतिक अधोगती हातात हात घालून खेळत चालत असल्याचे जे विलक्षण दृश्य लेखकाला दिसते. त्यामुळे या कादंबरीला प्रतिकात्मक रूप देण्याची प्रेरणा लेखकाला झाली. केवळ कलात्मक दृष्टीने विचार केला तरी ही कलाकृती फार श्रेष्ठ आणि यति-ययाती, शर्मिष्ठा-देवयानी, शुक्राचार्य व कच यांच्यातील विरोधी प्रकृती धर्माच्या चित्रणाने या कादंबरीतील स्वभाव रेखन फारच प्रभावी झाले आहे. या कादंबरीसाठी लेखकाने पात्रमुखी निवेदन पध्दती अवलंबिली असल्याने पात्रांच्या मनातील आंदोलने व विविध घटनांच्या पात्रांच्या मनावर होणाऱ्या प्रतिक्रिया याचे चित्रण प्रत्ययकारी वाटते; पण या कादंबरीचे खरे वैशिष्टय म्हणजे आजच्या वैचारिक जीवनातील वैचारिक संघर्षाचे जे प्रतिक या कादंबरीत आहे ते वाचकांच्या विचारांना चालना देणारे आहे. संसार असंख्य द्वंद्वांनी भरला आहे. त्यातील सुवर्णमध्य साधण्यातच जीवनाचे साफल्य आहे. शुक्राचार्य हा तपस्वी आजच्या विज्ञान युगाचे प्रतीक असून तपोबलाने अलौकिक शक्ती संपादन करून जगावर स्वामित्व गाजविण्याची त्याला ईर्षा आहे. उलट त्यांचा नम्र शिष्य कच आध्यात्मिक बलाने पाशवी शक्तीवर नियंत्रण करणारा असून ''हैड्रोजन बॉम्बकडे

भीतिग्रस्त दृष्टीने पाहणाऱ्या जगाला जो नवा मानव हवा आहे त्याचा पुराण काळातील प्रतिनिधी आहे.''[१] आजच्या युगाच्या संदर्भात पौराणिक कथांना नवा अर्थ देऊन व कचाचे उत्तरार्धातील जीवन आपल्या प्रतिभेने स्वतंत्रपणे कल्पून व ययाती या पात्राला आवश्यक महत्व देऊन लेखकाने कथानकात अधिक रंग भरला आहे. जुन्या कथांना नवा साज चढविल्याने त्या किती आकर्षक होऊ शकतात व पौराणिक कादंबरीला किती विस्तृत कार्यक्षेत्र आहे हे श्री. खांडेकरांनी ययाती कादंबरी लिहून सोदाहरण दाखविले आहे.

**समारोप :-**

अशा प्रकारे वाङ्मयात मराठी कादंबरीची वाटचाल असून त्यातील पौराणिक कादंबऱ्यांनी मराठी वाङ्मयात जी उत्तुंग झेप मारली ती अतिशय मोलाची आहे. येथे अभ्यासावयास असलेल्या 'आश्रमहरिणी' मराठी कादंबरी वाङ्मयाला पौराणिक रूपकात्मक कादंबरी लिहण्याचा पाया घातला तर 'ययाती' ने भारतीय साहित्य अकादमीचा ज्ञानपीठ पारितोषिक मिळवलं अशी मराठीतील पौराणिक कादंबऱ्यांची वाटचाल होती.

**संदर्भ टीपा :-**


१. ल.ग. जोग (महाराष्ट्रातील वाङ्मयीन प्रवाह- कादंबरी) चिरंजीव ग्रंथ प्रकाशन – पुणे, १९६३, आवृत्ती पहिली, पृष्ठ क्रमांक - १

२. डॉ. ग.ना. जोगळेकर (मराठी वाङ्मयाचा अभिनव इतिहास १८०० ते १९२०), प्रकाशक - श्री एल.व्ही. तावरे, १९९५ आवृत्ती द्वितीय, पृष्ठ क्रमांक - ९

३. डॉ. ग.ना. जोगळेकर (मराठी वाङ्मयाचा अभिनव इतिहास १८०० ते १९२०) प्रकाशक श्री. एल.व्ही. तावरे १९९५ आवृत्ती द्वितीय, पृष्ठ क्रमांक ११

४. रा.श्री. जोग (मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड - ४) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे - १९७३, आवृत्ती द्वितीय, पृष्ठ क्रमांक - २६२

५. कुसुमावती देशपांडे (मराठी कादंबरी – पहिले शतक, १८५०-१९५०) प्रकाशन - मुंबई मराठी साहित्य संघ – १९७५, आवृत्ती द्वितीय, पृष्ठ क्रमांक ३२३.

६. बापट गोडबोले (मराठी कादंबरी – तंत्र आणि विकास) व्हिनस प्रकाशन, पुणे सप्टेंबर १९७३, आवृत्ती तृतीय, पृष्ठ क्रमांक - २०२.

७. ल.ग. जोग (महाराष्ट्रातील वाङ्मयीन प्रवाह- कादंबरी) चिरंजीव ग्रंथ प्रकाशन – पुणे, १९६३, आवृत्ती पहिली, पृष्ठ क्रमांक - १३१

८. कुसुमावती देशपांडे (मराठी कादंबरी – पहिले शतक, १८५०-१९५०) प्रकाशन - मुंबई मराठी साहित्य संघ – १९७५, आवृत्ती द्वितीय, पृष्ठ क्रमांक ३२३.

९. बापट गोडबोले (मराठी कादंबरी – तंत्र आणि विकास) व्हिनस प्रकाशन, पुणे सप्टेंबर १९७३, आवृत्ती तृतीय, पृष्ठ क्रमांक - १७४.